आर बी आय / २००५-०६/३९९
आर पी सी डी. सी ओ आर एफ बी सी. सं. ८७/०७.३८.०१/ २००५-०६

जून ६, २००६

सर्व राज्य व जिल्हा केंद्रीय सहकारी बँका

प्रिय महोदय,

**अन्य निकास / संस्था यांच्या नावाने बँकेत बचत खाते उघडण्या बाबत**

दिनांक ऑक्टोबर १७, २००० चे परिपत्रक आर पी सी डी. सं. आर एफ. डी आइ आर. बी सी. ३०/०७.३८.०१/२००-०१ च्या द्वारे शासकीय खाती / निकाय / अभिकरण (प्रतिनिधी कार्यालय) यांना त्यांच्या **केंद्रीय शासन** पुरस्कृत विविध कार्यक्रम / योजना कार्यान्वित करण्यासाठी दिलेले अनुदान / आर्थिक सहायतेसाठी संबंधित शासकीय खात्यांकडून त्यां खात्याने बचत खाते उघडण्यास परवानगी दिली होती.

२) या बाबीचा पुनर्विचार करुन राज्य शासन खाती / निकाय / अभिकरण यांनाही त्यांच्या राज्य शासन पुरस्कृत विविध कार्यक्रम / योजना कार्यान्वित करण्यासाठी देण्यात आलेले अनुदान / आर्थिक सहायते साठी संबंधित **राज्य-शासन** खात्याकडून त्याने बचत खाते उघडण्यास परवानगी दिली आहे. या अर्थाच्या प्रमाणित प्राधिकरणाच्या आधारावर बँकांना बचत खाती उघडण्यास परवानगी देण्याचे ठरले आहे. संबंधित राज्य शासनाने जारी केलेल्या प्राधिकरणाची एक प्रत बँकानी आपल्या जवळ ठेवावी. त्यानुसार, उपरोक्त संबोधित दिनांक ऑक्टोबर १७, २००० चे निदेश आर पी सी डी डी आय आर. बी सी. २९/०७.३८.०१/२००-०१ मधील कलम ५(ii) (जी) हे दुरुस्त केले आहेत.
३. दुरुस्त केलेले दिनांक जून ७,२००७ चे निदेश आरपीसीडी आर एफ. डी आइ आर. ५५१६/०७.३८.०१/२००५-०६ सोबत जोडले आहेत.
४. कृपया आमच्या संबंधित क्षेत्रीय कार्यालयाला पोच द्यावी.

आपला विश्वासू

**(जी. श्री निवासन)**
**मुख्य महाव्यवस्थापक**

प्रभारी मुख्य महा व्यवस्थापक
आर पी सी डी. आर एफ. डी आय आर. ५५१६/०७.३८.०१/ २००५-०६

जून ६, २००६

**अन्य निकाय / संस्थांच्या नावाने बँकेत बचत खाते उघडणे**

बँकींग रेग्युलेशन ऍक्ट, १९४९ (सहकारी बँकांना लागू होणारा) च्या खंड २१ आणि ३५ए मध्ये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन आणि दिनांक ऑक्टोबर १७, २००० चे अनुदेश आर पी सी डी. सं. आर एफ डी आय आर. बी सी. २९/०७.३८.०१/२०००-०१ ना सुधारुन जनहितासाठी, हे आवश्यक आहे, ही खात्री झाल्यामुळे आरबी आय घोषित करत आहे की उपरोक्त अनुदेशातील पॅराग्राफ ५ मधील कलम (ii) (१) हे खाली दिल्या प्रमाणे ताबडतोब बदलले जाईल.

शासकीय खाती / निकाय / संस्था यांनी **संबंधित केंद्रीय / राज्य शासन** खात्याकडून बचत खाते उघडण्या संदर्भात प्राधिकरण प्रस्तुत केल्यास त्यांच्या केंद्रीय / राज्य शासन पुरस्कृत विविध कार्यक्रम / योजना कार्यान्वित करण्यासाठी संवितरित केलेल्या अनुदान / आर्थिक सहायता संदर्भात.

दिनांक नोव्हेंबर २, १९८७ च्या अनुदेश आर पी सी डी. सं. आर एफ. डी आय आर. बी सी. ५३/डी.१-८७/८८ च्या बाकी तरतुदींमधे काही ही बदल नाही.

**(व्ही. एस. दास)**
**कार्यसंचालक**